ISSN 2319-8648

UGC Approved Journal
Sr. No. 64310

Impact Factor - 2.143

Pre-Reviewed

Indexed (IIJIF)

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

**Special Issue**

**Issue I, Vol II 10th March 2018**

Godavari Manar Charitable Trust's

## Arts, Commerce & Science College, Shankarnagar

Tq. Biloli, Dist. Nanded

(NAAC Re-accredited 'B' Grade with CGPA 2.31 & ISO- 9001-2008)

**One Day Interdisciplinary National Conference**
**on**

## Globalization and Welfare States: Problems and Prospects

**Jointly Organized by**
**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded**
**&**
**Public Administration Association Maharashtra**

**Organized by**
**Department of Public Administration**
Arts, Commerce & Science College, Shankarnagar

**Editor In Chief**
**Mr. Arun B. Godam**
**Latur.**

**Convener**
**Dr. B. S. Pimple**
Principal, ACS College, Shankarnagar &
President, Public Administration Association Maharashtra

**Co-Convener**
**Dr. S. K. Lekhane**
(HOD Pub. Adm.)

**Coordinator**
**Dr. A. C. Sonkamble**
(Asso. Prof. Pub. Adm.)

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR



# Index



| Sr. No. | Paper Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | वैश्वीकरण के दौर में हिंदी भाषा की स्थिति और गति | डॉ.निवृत्ती भागवत | 1 |
| 2 | "वैश्वीकरण तथा आरक्षण" | डॉ. पवार विक्रमसिंह विजयसिंह | 3 |
| 3 | सामाजिक न्याय और भारत की स्थिती | प्रा.डॉ.डी.के.खोकले | 6 |
| 4 | वैश्वीकरण के दौर में हिंदी भाषा का महत्त्व | प्रा.डॉ.पी.एम.भुमरे | 10 |
| 5 | जागतिकीकरणाचा भारतीय लोकप्रशासनावर (शासनावर) होणारा परिणाम | प्रा.किशोरकुमार मनोहरराव इंगळे | 14 |
| 6 | जागतिकीकरणाचा महिला सबलीकरणांवर प्रभाव | प्रा. आशा दगडू आकोलकर | 17 |
| 7 | जागतिकीकरण आणि सामाजिक न्याय | प्रा.डॉ.नवनाथ गोविंदराव अडकिणे | 19 |
| 8 | कल्याणकारी राज्य व समाजकल्याण प्रशासन | डॉ.रेखा कलवले | 22 |
| 9 | ७३ वी घटना दुरुस्ती व मागासवर्गीय महिला आरक्षण | प्रा.डॉ.बी.आर.कत्तुरवार | 25 |
| 10 | सामाजिक कायदे : समाजकल्याणाचे एक साधन | प्रा.डॉ.सुधाकर भालेराव | 28 |
| 11 | जागतिकीकरण आणि आरक्षण धोरण : स्वरुप व वास्तव | डॉ. प्रमोद चव्हाण | 31 |
| 12 | जागतिकीकरण आणि सामाजिक न्याय | प्रा. रामचंद्र गायकवाड | 35 |
| 13 | जागतिकीकरण व सामाजिक न्याय | प्रा.चावरे मधुकर विठ्ठलराव | 38 |
| 14 | जागतिकीकरण व सामाजिक न्याय | शिवाजी रामराव कराळे | 41 |
| 15 | जागतिकीकरणाचा डिजीटल ग्रंथालयावर झालेला प्रभाव | प्रा. वाघमारे संजय शामराव | 45 |
| 16 | जागतिकीकरण आणि आण्विक दहशतवाद | प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी | 48 |
| 17 | कल्याणकारी राज्य व समाज कल्याण प्रशासन | डॉ.सुरेश गजभारे | 50 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol. II , 10th March 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# ७३ वी घटना दुरुस्ती व मागासवर्गीय महिला आरक्षण

प्रा.डॉ.बी.आर.कत्तुरवार
*विभाग प्रमुख , लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र, देगलूर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड.*

------------- (09) -------------

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये प्रजासत्ताक संसदीय लोकशाही शासन प्रणालीची स्थापना करुन लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा स्विकार करण्यात आला. त्यामुळे शासनाच्या पर्यायाने प्रशासनाच्या कार्यात प्रचंड वाढ झाली. जनतेचा पर्यायाने राष्ट्राचा सर्वांगीण विकास घडविण्याची जबाबदारी शासनावर येऊन पडली.

भारत हा खेडयांचा देश असून एकूण लोकसंख्येच्या ७० टक्के जनता ग्रामीण भागात वास्तव्य करीत असते. त्यामुळे जोपर्यंत ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. या जाणिवेतूनच महात्मा गांधीनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्वानुसार ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी पंचायतीराज संस्थाची स्थापना करण्यात आली. यात जिल्हास्तरावर जिल्हा परिषद, तालुका स्तरावर पंचायत समिती आणि गाव पातळीवर ग्राम पंचायत अशी त्रिस्तरीय पंचायतीराज संस्थाची स्थापना करण्यात आली.

पंचायतीराज संस्थाच्या स्थापनेपासून ते १९९३ पर्यंतच्या पंचायतीराज संस्थाच्या अभ्यास केल्यास या संस्थावर समाजातील मुठभर उच्चवर्णीय लोकाचे वर्चस्व होते. जो समाज घटक शेकडो वर्षापासून सामाजिक, राजकीय व आर्थिकदष्टया प्रचंड मागासलेला होता अशा मागासवर्गीय जाती जमातीतील लोकांना पंचायतीराज संस्थेत महत्वपुर्ण स्थान नव्हते.

महिला व मागासवर्गीय समाज अर्थकारण, राजकारण, प्रशासन व समाजकारणापासुन अलिप्त होता, त्यांचे स्थान गावकूसाबाहेर होते, अस्पृश्य म्हणून अमानवीय वागणूक दिली जात होती अशा मागासवर्गीय समाजास पंचायतीराज्य संस्थेत राखीव जागा ठेवण्यासाठी ७३ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकाच्या मागास प्रवर्गासाठी राखीव जागा ठेवण्यात येऊ लागल्या.

पंचायती संस्थेत मागासवर्गीय लोकसंख्येच्या प्रमाणात ज्या जागा राखीव ठेवण्यात येतात त्यामध्ये मागावर्गीय महीलांसाठी तेहतीस टक्के जागा राखीव ठेवण्याचीही तरतूद करण्यात आली. म्हणजेच S.C प्रवर्गासाठी ६ जागा राखीव असतील तर त्यापैकी २ जागा त्याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली. या क्रातीकारी तरतूदीमुळे मागासवर्गीय स्त्री-पुरुषांना, समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी मिळाली. ज्या मागासवर्गीयाला सार्वजनिक ध्वजारोहणाचे साधे निमंत्रण देखील दिले जात नव्हते अशा मागासवर्गीय स्त्री-पुरुषाला गावचा पाहिला नागरीक होण्याचा बहुमान मिळाला तसेच पंचायत समितीचे सभापती व जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होण्याचाही बहुमान मिळाला आहे.

नांदेड जिल्हयातील १००मागासवर्गीय महीला सरपंचाचा अभ्यास केला असून संशोधनाअंती जे निष्कर्ष निघाले ते खालीलप्रमाणे आहेत.

१) ज्या ठिकाणी मागासवर्गीय महिला सरपंच,सभापती आहेत. त्या ठिकाणी काही प्रमाणात प्रस्थापीत लोकांचा हस्तक्षेप असून संशोधनात ७२ टक्के मागासवर्गीय महिला नाममात्र स्वरुपात काम करतांना दिसून येतात.

२) राखीव जागांच्या तरतूदीमुळे मागासवर्गीय समाजात जागरुकता झाली असून सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे.


Copyright © Shaurya Publication, Latur | www.rjorunals.co.in | Email-hitechresearch11@gmail.com

३) पंचायतीराज्य संस्थेतील सुशिक्षीत महिला मागसवर्गीय नेतृत्वाची भुमिका समाधानकारक असून असे मागासवर्गीय पदाधिकारी स्वतः कामकाज पाहत असून त्या ठिकाणी प्रस्थापितांचे वर्चस्व कमी झाले आहे. मागसवर्गीयांची प्रशिक्षणार्थी वाटचाल असून काही कालावधीनंतर सक्षम नेतृत्व होईल.

४) पंचायतीराज संस्थेतील मागासवर्गीयांच्या सहभागाला २५ वर्ष पुर्ण झाले असून राजकीय परिवर्तनाची प्रक्रिया चालू आहे. मागासवर्गीय नेतृत्वाच्या योगदानामुळे या संस्थेतील प्रस्थापितांचे वर्चस्व कमी झाले आहे.

५) पंचायतीराज संस्थेमधील अधिकारी व महिला पदाधिकारी संबंध चांगले असून काही अपवादात्मक प्रकरणे सोडल्यास नांदेड जिल्हयात अधिकारी- पदाधिकारी वाद उद्‌भवलेले नाहीत. यावरुन त्यांचे परस्परातील संबंध चांगले आहेत.

६) पंचायचीराज संस्थेतील मागासवर्गीयांच्या सहभागामुळे विशेषतः मागासवर्गीय समाजासाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे.

**मागासर्गीय महिला सरपंचाची भूमिका प्रभावी बनविण्यासाठी उपाय :**

**१) आरक्षणाचा कालावधी किमान १० वर्षाचा असावा :**

ग्रामपंचायतीचे सरपचंपद, पंचायत समितीचे सभापतीपद व जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद एखाद्या विशिष्ट प्रवर्गासाठी केवळ ५ वर्षासाठी राखीव असते. याऊलट विधानसभा व लोकसभेच्या निवडणूकीत २० वर्ष मतदारसंघ राखीव ठेवला जातो. नविन सरपंचाची ( २ ते २ १/५ ) दोन ते अडीच वर्ष कार्यप्रणाली समजण्यासाठी जात असतात. त्यांना अनुभव नसतो त्यामुळे पुन्हा गावचा सरपंच होण्यासाठी आरक्षण कालावधी किमान १० वर्षासाठी पद राखीव असावा.

**२) उपसरपंच, उपसभापती व जि.प.उपाध्यक्ष व विषय समिती या दुय्यम पदांना आरक्षण असावे.**

संशोधनात असे निदर्शनास आले आहे की, ज्या पंचायतीराज संस्थेत प्रमुख पद मागासवर्गीय महिलांसाठी आरक्षीत असते तिथे उपसरपंच अथवा उपसभापती पदावर खुल्या प्रवर्गातील सदस्यांची निवड केली जाते. व तेच ग्रामपंचायतीचा प्रत्यक्ष कारभार चालवितात. त्यामुळे मागासवर्गीय महिला पदाधिकाऱ्यांला योग्य संधी मिळत नाही. त्यामुळे दुय्यम पदांना आरक्षण असावे तसेच जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या विषय समित्यांमध्ये राखीव जागेची तरतूद करण्यात यावी.

**३) जात वैधता प्रमाणपत्र उमेदवारी अर्ज भरतानाच बंधनकारक असावे :**

पंचायतराज संस्थाच्या निवडणूकीत अनेक उमेदवार बनावट जात प्रमाणपत्र देऊन निवडणूक लढवितात निवडणूक जिंकल्यानंतर काही व्यक्ती त्यावर आक्षेप घेतात. जात प्रमाणपत्र बनावट असल्याचे निदर्शनास आल्यास जिल्हाधिकारी ती निवड अवैध घोषीत करतात. या निर्णयाविरुध्द न्यायालयात आव्हान दिले जाते. यामुळे खऱ्याखुऱ्या मागासवर्गीय व्यक्तीला वंचित रहावे लागते. तर काही ठिकाणी पोटनिवडणूक घेतल्या जातात. त्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र उमेदवारी अर्जाच्यावेळी सादर करणे बंधनकारक करावे.

**४) मागासवर्गीय महिला पदाधिकाऱ्यांनी संकुचित दृष्टिकोणाचा त्याग करावा :**

जे मागासवर्गीय महिला पदाधिकारी प्रस्थापितांच्या वर्चस्वाला बळी न पडतालोकशाहीत्मक पध्दतीने पंचायतीराज संस्थेचे काम पाहत आहेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली मागासवर्गीय समाजासाठी असलेल्या योजनांची प्रभाविपणे अंमलबजावणी होत आहे. परंतु या मागासवर्गीय पदाधिकाऱ्यांनी विविध योजनांचा लाभ आपल्या नातेवाईकांनाच मिळवून दिला आहे. परिणामी तळागळातील मागासवर्गीय व्यक्तींना विविध योजनांची माहिती देखील दिली जात नाही. त्यामुळे संकुचीत दृष्टीकोन सोडावा.

**५) मानधन व बैठक भत्यात वाढ करावी. :**

नांदेड जिल्हयातील ७० टक्के मागासवर्गीय सरपंच असे आहेत की, ज्यांचे वार्षिक उत्पन्न २५०००/- रु पेक्षा कमी आहे. अनेक पदाधिकारी रोजंदारीवर कामाला जाऊन उदरनिर्वाह भागवत असतात . जर ग्रामपंचायतीच्या बैठकीला नियमीतपणे उपस्थित राहील्यास मजुरी बुडते त्यामुळे ते अनुपस्थित राहतात. त्यामुळे किमान रोजंदारीतील मजुरीऐवढा बैठक भत्ता असावा.

६) **ग्रामसभांचे नियमीतपणे आयोजन करण्यात यावे. :**

ग्रामसभा ही प्रत्येक लोकशाहीचा अविष्कार आहे. त्यामुळे ग्रामसभांचे आयोजन नियमीतपणे व प्रामाणिकपणे करण्यात यावे.

७) **सुशिक्षीत व अनुभवी महिला उमेदवारीला प्राधान्य देण्यात यावे.**

निरक्षर अथवा अल्पशिक्षीत सरपंचला अनेकदा इतरांची मदत घ्यावी लागते. कित्येक ठिकाणी त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेतला जातो. अर्थात अशिक्षीत व्यक्ती अकार्यक्षम असते असा दावा करणे चुकीचे आहे.पण सुशिक्षीत व्यक्तीच्या तुलनेत अशिक्षीत व्यक्ती फसली जाण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे राजकीय पक्षांनी उमेदवार निवडताना व मतदारांनी मतदान करताना सुशिक्षीत व अनुभवी महिला उमेदवाराला प्राधान्य द्यावे.

८) **लोकांच्या मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे. :**

उच्चवर्णीय व मागासवर्गीय लोकप्रतिनिधी एकत्रीत काम करीत असले तरी अजूनही त्यांच्यात खऱ्या अर्थाने मनोमिलन झाले नाही. त्यांच्यामध्ये परस्पर जिव्हाळा / आपुलकीचे संबंध दिसून येत नाहीत. सकारात्मक भावना दोन्ही गटातील लोकांच्या वाणी, वर्तन व विचारात दिसली पाहीजे.

९) प्रत्येक ग्रामपंचायतीस स्वतंत्र ग्रामसेवक असावा व त्याचे वास्तव्य त्याच गावातअसावे.

१०) सर्व महिला व पुरुष पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण दर्जेदार स्वरुपाचे देण्यात यावे. तसेच ते प्रारंभीच्या सहा महिन्याच्या आत देण्यात यावे.

११) ग्रामपंचायत कार्यालय स्वतंत्र असावे व ते ग्रामपंचायतीसाठीच वापरण्याचे बंधन असावे.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded